| MHST090013522019 | दाखल दिनांक | ०४/११/२०१९ |
|---|---|---|
| | नोंदणी दिनांक | ०४/११/२०१९ |
| | निकाल दिनांक | २७/०७/२०२६ |
| | कालावधी | वर्ष महिने दिवस<br>०६ ०८ २३ |

## भाग अ

**कोरेगाव येथील न्यायदंडाधिकारी वर्ग –१,यांचे न्यायालयात,ता. कोरेगाव,जि. सातारा.**

(पिठासिन अधिकारी पी.डी.यवतकर)

**नियमीत फौजदारी खटला क्र.२१५/२०१९** **निशाणी क्र.२६**

| | | |
|---|---|---|
| **प्रथम खबर अहवालचा तपशिल:** | **अपराध क्र.:** | १८४/२०१९ |
| | **पोलीस स्टेशन:** | कोरेगाव, ता. कोरेगाव, जि. सातारा. |

| | |
|---|---|
| फिर्यादी | **महाराष्ट्र शासन,**<br>मार्फत कोरेगाव पोलीस स्टेशन,<br>ता. कोरेगाव, जि. सातारा |
| प्रतिनिधीत्व | सहायक सरकारी अभियोक्ता श्रीमती एन.एन.पवार. |
| आरोपी | **१. भाग्यश्री पवन शिंदे**<br>वय – २१ वर्षे, व्यवसाय – मजुरी,<br>**२. संगिता कुमार शिंदे**<br>वय – २३ वर्षे, व्यवसाय – मजुरी,<br>दोघे रा.औंध रस्ता, रहिमतपूर,<br>ता.कोरेगाव, जि.सातारा. |
| प्रतिनिधीत्व | आरोपीतर्फे विधिज्ञ श्री.एच.एच.पिसाळ |

## भाग ब

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची दिनांक | १९/०७/२०१९ |
| फिर्याद दाखल दिनांक | १९/०७/२०१९ |
| दोषारोप दाखल दिनांक | ०४/११/२०१९ |
| दोषरोप ठेवल्याचा दिनांक | १५/०४/२०२६ |
| प्रकरणात पुरावा सुरु झाल्याची दिनांक | २७/०७/२०२६ |
| प्रकरण न्यायनिर्णयासाठी ठेवल्याची दिनांक | २७/०७/२०२६ |
| न्यायनिर्णय घोषित दिनांक | २७/०७/२०२६ |
| शिक्षा सुनविल्याचा आदेशाची दिनांक जर असेल तर | -- |

## आरोपीचा तपशिल

| अ. क्र. | आरोपीचे नाव | अटक दिनांक | जामीनावर सोडल्याचा दिनांक | दोषारोप कलम | निर्दोष अथवा दोषी | शिक्षा दिली असल्यास किती | न्यायालयीन बंदी कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | भाग्यश्री पवन शिंदे | १९/०७/२०१९ | २२/०७/२०१९ | भा.द.वि.संहिता कलम ४५४, ३८०,३४ | निर्दोष | निरंक | निरंक |
| २. | संगिता कुंभार शिंदे | २६/०७/२०१९ | २६/०७/२०१९ | | | | |

## भाग क

## अभियोग पक्षातर्फे साक्षीदार/आरोपीतर्फे साक्षीदार/न्यायालयीन साक्षीदार यांची यादी

### अ. अभियोग पक्षातर्फे साक्षीदार

| साक्षीदार क्र. | नि.क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|---|
| १. | २१ | जीवन कृष्णा काटे | फिर्यादी |

### ब. आरोपीतर्फे साक्षीदार

| साक्षीदार क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क. न्यायालयीन साक्षीदार**

| साक्षीदार क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

## अभियोग पक्ष/ आरोपी/ न्यायालयीन पुराव्यांची यादी

**अ. अभियोग पक्षाचा पुरावा**

| क्र. | निशाणी क्र. | कागदपत्राचे वर्णन |
|---|---|---|
| १ | २२ | फिर्याद सहीपूर्ती |

**ब. बचावपक्षाने मान्य केलेले कागदपत्रे**

| क्र. | निशाणी क्रमांक | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

**क. न्यायालयातर्फे दिलेल्या निशाणी क्रमांकाची यादी**

| क्र. | निशाणी क्रमांक | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

**ड. मुद्देमाल**

| अ.क्र. | वर्णन |
|---|---|
| १ | निरंक |

## न्यायनिर्णय

(अधिघोषीत दिनांक: २७ जुलै, २०२६)

प्रस्तुत प्रकरणातील आरोपी याचे विरुद्ध भारतीय दंड विधान कलम ४५४, ३८०, ३४ अन्वये खटला चालविण्यात आला.

**<u>अभियोग पक्षाची हकीकत संक्षिप्त स्वरूपात खालीलप्रमाणे आहेः–</u>**

२) दिनांक १९/०७/२०१८ रोजी मी सकाळी ०८.३० वा.चे सुमारास नेहमीप्रमाणे कामावर आले, सकाळी ११.३०वाजता भारतगॅसच्या गाड्या भरून कोरेगाव तालुक्यातील गावांमध्ये डिलिव्हरीसाठी गेल्या, त्यांना दुपारी २.३० वा.चे सुमारास भारतगॅस कंपनीमधील टाटा कंपनीचा ट्रक क्रं. एमएच/११/एएल/४२०८ यावरील चालक नामे महेश मोहन माने रा भोसे ता कोरेगाय यांचा त्यांच्या मोबाईल फोनवर फोन आला की,आपले कंपनीतील गोडाऊनचे पाठीमागील बाजूस असलेल्या स्टोअर रूमच्या बंद खोलीमध्ये चार महिलांना मी चोरी करीत असताना बघितले असून, त्यातील एक महिला मला पाहताच पळून गेलेली आहे, इतर तीन महिलांना मी तिथेच थांबवुन ठेवले आहे असे म्हणालो. त्यानंतर ते लागलीच तिथे आले व नंतर ते व महेश मोहन माने यांनी सदर ठिकाणी जावुन पाहिले असता बारदानाचे पोत्यामध्ये भरलेल्या साहित्य पाहिले असता त्यांच्या गोडाऊनचे पाठीमागे असलेल्या स्टोअर रूमच्या बंद खोलीकडे पाहिले असता, त्या खोलीचा दरवाजाची बिजागरी कशाने तरी तोडुन काढलेला दिसला. त्यांनी खोलीमध्ये जावुन खोलीतील साहित्याची पाहणी केली असता सदर ठिकाणचे खोलीतील साहित्य चोरीस गेलेले दिसले व इतर साहित्य अस्ताव्यस्थ पडलेले दिसले नंतर मी त महिलाच्या ताब्यात असलेल्या बारदानातील पोत्यातील साहित्य चेक केले असता त्यामध्ये गोडाऊनच्या स्टोअररूमच्या बंद खोलीत ठेवलेला ट्रकचा जॉक, जॉकच्या ट्रॉल्या, एक स्टेअरिंगचे व्हील वस्तु चोरुन नेहत असताना मिळुन आले. म्हणुन त्यांनी खोलीतील गेलेल्या साहित्याचे व बारदानातील साहित्य, त्याच खोलीतील असलेची खात्री झालेने त्याच महिलांनी चोरी केलेची त्यांची खात्री झाली. म्हणून आरोपी विरुध्द फिर्याद दाखल केली.

३) फिर्यादच्या अनुषंगाने आरोपींविरुध्द भारतीय दंड विधान कलम ४५४, ३८०, ३४ कोरेगाव पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि.क्र.१८४/२०१९ नोंदविण्यात आला. तपासी अधिकारी पो.ना.एस.एस.आवटे यांनी गुन्हयाचा तपास करून घटनास्थळ पंचनामा केला, जप्ती पंचनामा केला, साक्षीदारांचे जबाब नोंदविले व आरोपींविरुध्द पुरावा मिळून आल्याने त्यांच्याविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

४) आरोपींविरुध्द भारतीय दंड विधान कलम ४५४, ३८०, ३४ प्रमाणे नि.क्र.१५ अन्वये दोषारोप ठेवण्यात आले. आरोपींनी गुन्हा केला नसल्याचे कथन केले व खटला चालविण्याची मागणी केली. आरोपी विरुध्द कोणाताही आक्षेपहार्य पुरावा मिळून न आल्यामुळे त्यांचे विरुध्द फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वये निवेदन वगळण्यात आलेले आहे.

५) अभियोग पक्षाचे कथन, दोषारोप, अभियोग पक्षाचा पुरावा यांचा विचार करता उक्त मुद्दे विवेचनाकरिता उपस्थित झाले आहेत. सदर मुद्यांवरील माझे निष्कर्ष आणि निष्कर्षाची कारणे खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दि. १९/०७/२०१८ रोजी मी दुपारी २.३० वा.चे सुमारास मौजे कोरेगाव हद्दीत कोरेगाव औद्योगिक क्षेत्रामध्ये, रहिमतपूर–कोरेगाव रस्त्यावरील हरिश ॲड सन्सकडे जाणा–या रस्त्यालगत, आरोपींनी आपापसात संगनमत करुन विधीसंघर्षीत बालकांसह भारत गॅस गोदामाच्या मागील बाजूस असलेल्या उत्तराभिमुख पश्चिमेकडील बंद खोलीचे दाराचे कुलूप तोडून, समान हेतुने खोलीत बेकायदेशीरपणे चोरी करण्याच्या उद्देशाने प्रवेश केला व त्याद्वारे भारतीय दंड विधान कलम ४५४ | |

| | | |
|---|---|---|
| | सह ३४ अन्वये गुन्हा केला, हे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय ? | ... नाही. |
| २. | वरील तारखेस, वेळी, व ठिकाणी आरोपींनी आपापसात संगनमत करुन विधीसंघर्षीत बालकांसह फिर्यादीच्या ताब्यातील एक जॅक, जॅक ट्रॉली व स्टेअरिंग व्हील अशी मालमत्ता चोरुन नेली व त्याद्वारे भारतीय दंड विधान कलम ३८० सह ३४ अन्वये गुन्हा केला, हे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय ? | ... नाही. |
| ३. | आदेश ? | आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात येत आहे. |

**: कारणमिमांसा :**

**६)** आरोपींवर ठेवण्यात आलेला गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने फिर्यादी सा.क्र.१ जीवन कृष्णा काटे यांना नि.क्र.२१ प्रमाणे तपासलेले आहे. त्यानंतर फिर्यादीने प्रकरणामध्ये त्याला पुढे कोणताही पुरावा दयायचा नाही अशी पुरसीस पटलावर नि.क्र.२३ वर दाखल केल्यामुळे अभियोग पक्षाचा पुरावा बंद केला.

**मुद्दे क्र. १ व २ बाबत –**

**७)** अभियोग पक्षातर्फे फिर्यादी सा.क्र.१ जीवन कृष्णा काटे यांनी सरतपासात घटना काय घडली, कुठे घडली हे माहित नसल्याचे कथन केले आहे. त्यांनी फिर्यादवरील तिची सही ओळखली, परंतु फिर्याद मधील मजकूर नाकारला, त्यामुळे फिर्यादीची फिर्याद सिध्द झाली नाही. सदर साक्षीदाराने अभियोग पक्षास सहकार्य केलेले नाही. त्यामुळे सदर साक्षीदाराला अभियोग पक्षाने फितुर घोषित करुन उत्तर सुचक प्रश्न विचारले असता

अभियोग पक्षास मदत होईल अशी कोणतीही बाब पटलावर आलेली नाही. याउलट, सदर साक्षीदाराने त्याच्या उलटतपासामध्ये आरोपी व त्याच्या मध्ये न्यायालयाबाहेर तडजोड झाली असल्याचे मान्य केले आहे.

८) अभिलेखावर दाखल असणारा पुरावा व संपुर्ण अभिलेखाचा अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, फिर्यादी व आरोपी मध्ये तडजोड झाल्याबाबतची पुरसीस नि.क्र.२० प्रमाणे दाखल केली आहे. परंतु, सदर गुन्हयातील भारतीय दंड संहिता कलम ४५४ हा तडजोड पात्र नसल्याने सदरची तडजोड केवळ दाखल करण्यात आलेली आहे. नि.क्र.२३ वरील पुरसीस अन्वये फिर्यादीने तिला इतर कोणतेही साक्षीदार तपासावयाचे नाहीत अथवा लेखी पुरावा दयायचा नाही असे कथन केले आहे. सबब, फिर्यादीची आरोपी विरुध्द कोणतीही तक्रार नाही. त्यामुळे तिचा पुरावा पाहता पुढील साक्षीदारांची साक्ष घेवून देखील सदर गुन्हा शाबित होवू शकत नसल्याने अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला आहे. तसेच **मदन मोहन अबोट वि. स्टेट ऑफ पंजाब, ए.आय.आर. २००८ सुप्रिम कोर्ट १९६९** या न्यायनिर्णयामध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने विषद केले आहे की, फौजदारी वाद आपापसांत मिटले असतील तर न्यायालयाने विनाकारण वेळ खर्च करणे उचित नाही.

९) फिर्यादीने त्याच्या सरतपासात आरोपींनी आपापसात संगनमत करुन विधीसंघर्षीत बालकांसह भारत गॅस गोदामाच्या मागील बाजूस असलेल्या उत्तराभिमुख पश्चिमेकडील बंद खोलीचे दाराचे कुलूप तोडून, समान हेतुने खोलीत बेकायदेशीरपणे चोरी करण्याच्या उद्देशाने प्रवेश केला व फिर्यादीच्या ताब्यातील एक जॅक, जॅक ट्रॉली व स्टेअरिंग व्हील अशी मालमत्ता चोरुन नेल्याचे नाकारले, त्यामुळे आरोपीं विरुध्द कोणताही ठोस पुरावा पटलावर आलेला नाही. फिर्यादी व आरोपीं मध्ये तडजोड झाल्याचे

मान्य केले असल्यामुळे अभियोग पक्षाने फिर्याद सिध्द केली नाही.

**१०)** प्राप्त पुराव्यानुसार आरोपीं विरुध्द गुन्हा सिध्द न झाल्याने आरोपींना दोषी धरणे माझ्यामते योग्य व उचित नाही. ज्याअर्थी अभियोग पक्षातर्फे आरोपीवर ज्या कलमांतर्गत दोषारोपपत्र दाखल करण्यात आले त्यातील अनुषंगिक घटक हे पुराव्यानिशी सिध्द करू शकले नाही, त्याअर्थी आरोपी हे संशयाचा फायदा मिळण्यास पात्र आहेत. अभियोग पक्षातर्फे आरोपी विरूध्द भारतीय दंड संहिता, १८६० कलम ४५४, ३८० सह ३४ मधील कायदेशीर तरतुदींनुसार गुन्हा शाबित करणारा कोणताही पुरावा दाखल केलेला नाही. तसेच आरोपींविरूध्द कायदेशीर तरतुदींनुसार कोणताही गुन्हा शाबित होत नसल्याने मी **मुद्दे क्र.१ ते ३** चे उत्तर **नकारार्थी** देत आहे.

**मुद्दा क्र.४ करीता –**

**११)** वरील मुद्दे क्र.१ ते ३ च्या निष्कर्शानुसार मी या निष्कर्शास आले आहे की, आरोपीं विरुध्द सदर गुन्हयाचे कामी कोणताही पुरावा न आल्यामुळे गुन्हा शाबीत झालेला नाही. त्यामुळे आरोपी हे निर्दोष मुक्त होणेस पात्र आहेत. सबब मुद्दा क्र.४ च्या उत्तरादाखल मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

(१) आरोपी क्र.**१) भाग्यश्री पवन शिंदे** व **२) संगिता कुमार शिंदे** यांची फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ कलम २४८ (१) अन्वये भारतीय दंड संहिता, १८६० कलम ४५४, ३८० सह ३४ नुसार शिक्षेस पात्र असलेल्या गुन्हयातून निर्दोष मुक्तता करण्यात येते.

(२) आरोपींनी दिलेला जामीन व वैयक्तिक जातमुचलके रद्द करण्यात येतात.

(३) जप्त मुद्देमाल एक जॅक, जॅक ट्रॉली व स्टेअरिंग व्हील हा मुळ मालकास परत देण्यात आला असून सदरील मुद्देमाल मुळ मालकाकडे कायम ठेवण्यात यावा.

(४) आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७अ अन्वये प्रत्येकी रक्कम रु.१५,०००/– चा जामीन दयावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात उद्घोषीत करण्यात आला. )

PUSHPLATA DHONDIRAJ YAVATKAR

Digitally signed by PUSHPLATA DHONDIRAJ YAVATKAR
Date: 2026.07.27 17:47:02 +0530

दिनांक – २७/०७/२०२६ **( पी.डी.यवतकर )**
कोरेगाव प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी कोरेगाव
ता.कोरेगाव, जि.सातारा.